Government of Maharashtra

MAGNETIC MAHARASHTRA
CONVERGENCE 2018
Global Investors Summit - Feb 18-20

# वस्त्रोद्योग धोरण

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
उद्योग विभाग

Government of Maharashtra

# वस्त्रोद्योग धोरण 2018–23

## प्रस्तावना

देशाचा पश्चिम व मध्य भाग व्यापलेल्या महाराष्ट्र राज्याला अरबी समुद्राचा 720 कि.मी. लांबीचा विस्तीर्ण सागरी किनारा लाभला आहे. पश्चिमेकडील सह्याद्री पर्वताच्या रांगा राज्याचा नैसर्गिक कणा असून उत्तरेस असलेल्या सातपुडा पर्वताच्या रांगा व पुर्वेस असलेल्या भामरागड–चिरोली–गायखुरी या डोंगररांगा राज्याच्या नैसर्गिक सीमा आहेत. राज्याला वायव्येस गुजरात, उत्तरेस मध्यप्रदेश, पुर्वेस छत्तीसगढ, आग्नेयेस तेलंगणा, दक्षिणेस कर्नाटक व नैऋत्येस गोवा या राज्यांनी वेढले आहे.

लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकाचे राज्य असून जनगणना–2011 नुसार राज्याची लोकसंख्या 11.24 कोटी असून ती देशाच्या एकूण लोकसंख्येच्या 9.3 टक्के आहे. राज्याचे भौगोलिक क्षेत्र 3.08 लक्ष चौ.कि.मी. आहे. राज्याचे मोठया प्रमाणावर नागरीकरण झाले असून 45.2 टक्के लोकसंख्या नागरी भागात राहते.

मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी तसेच देशाची आर्थिक राजधानी असून बहुतांशी प्रमुख खाजगी कंपन्या व वित्तीय संस्थांची मुख्यालये या शहरात आहेत. देशातील प्रमुख शेअर बाजार व भांडवली बाजार आणि विक्रेय वस्तू विनिमय केंद्रे मुंबईत आहेत. राज्यात 36 जिल्हे असुन ते मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या सहा महसूली विभागात विभागले आहेत. शेती हा महाराष्ट्रातील लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. राज्यात अन्नधान्याची व नगदी अशी दोन्ही पिके घेतली जातात.

चांगल्या प्रकारे विकसित पायाभूत सुविधा, मुबलक नैसर्गिक साधनसंपत्ती, सर्व प्रमुख भागांशी दळणवळण, कुशल मनुष्यबळ आणि दर्जेदार शिक्षण यामुळे महाराष्ट्र हे नवीन उद्योगधंदे उभारणीसाठी आदर्श स्थान बनले आहे. राज्याने पायाभूत सुविधा आणि स्मार्ट शहरे यावर लक्ष केंद्रित केले आहे.

## वस्त्रोद्योग –

सकल राष्ट्रीय उत्पादनातील मोठा हिस्सा औद्योगिक उत्पादन, रोजगार निर्मिती, निर्यात उत्पन्न या बाबी विचारात घेता देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये वस्त्रोद्योगाची महत्वाची भूमिका आहे. देशाच्या औद्योगिक उत्पादनातील 14 टक्के, राष्ट्रीय सकल उत्पादनातील 4 टक्के व देशाच्या एकूण निर्यातीतील 13 टक्के हिस्सा वस्त्रोद्योगाचा आहे. देशात रोजगार निर्मितीचे वस्त्रोद्योग हे मोठे साधन आहे. वस्त्रोद्योगांमध्ये सुमारे 5 कोटी लोक प्रत्यक्ष काम करतात. जगातील वस्त्रोद्योगाच्या एकूण क्षमतेपैकी भारताची वस्त्रोद्योगाची क्षमता दुसऱ्या क्रमांकाची आहे. कच्च्या मालाचे मुबलक उत्पादन, कुशल मनुष्यबळाचा अविरत पुरवठा, उत्पादनाची किमान किंमत, ही भारताच्या वस्त्रोद्योगाची बलस्थाने आहेत. देशातील सन 2016–17 मधील तयार कपडयांची बाजारपेठ अंदाजे रुपये 6 लाख कोटी आहे. तयार कपडयाची देशातील मागणी साधारणपणे 3 विभागात विभागली जाते. त्यामध्ये घरगुती वापर, औद्योगिक वापर आणि निर्यातक्षेत्र अशी विभागणी आहे. एकूण तयार कपडयांपैकी 60 टक्के तयार कपडा घरगुती क्षेत्रात वापरण्यात येतो, तर 21 टक्के संस्थात्मक क्षेत्रातील वापर असुन, निर्यात 19 टक्के इतकी आहे. कापड व तयार कापडाची देशाची निर्यात यापुढील काळात वाढतच राहणार आहे.

राज्याच्या आर्थिक संरचनेमध्ये वस्त्रोद्योगाची महत्वाची भूमिका आहे. वस्त्रोद्योगामध्ये कृषि क्षेत्रानंतर सर्वात जास्त रोजगार निर्मितीची क्षमता आहे. राज्यात जिनिंग, स्पिनिंग आणि विव्हिंग या क्षेत्राची वाढ मोठया प्रमाणावर झाली आहे. राज्यात रेल्वे, रस्ते, बंदरे, विमानतळ इत्यादी दळणवळणाची साधने, उत्तम प्रतिची वीज उपलब्ध आहे. या शिवाय राज्यात कुशल मनुष्यबळ व कापुस मोठया प्रमाणावर उपलब्ध आहे. राज्यात उत्पादित होणाऱ्या सर्व कापसावर राज्यातच प्रक्रिया होऊन मुल्यवर्धनाचा फायदा राज्याला मिळावा यासाठी कापूस ते कापड हे उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेऊन जानेवारी 2012 मध्ये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग धोरण 2011–17 जाहीर केले. या धोरणाची फलनिष्पत्ती म्हणून राज्यात रुपये 18 हजार कोटींची गूंतवणूक व 3 लाख रोजगार निर्मीती झाली व राज्यात एकुण 45 लाख गाठीवर प्रक्रीया करणारे उद्योग स्थापन झाले आहेत.

कापसाशिवाय राज्यात विपूल प्रमाणात रेशीम निर्मिती होत आहे. रेशीम उद्योग हा शेती व वनावर आधारीत रोजगार निर्मिती करणारा महत्वाचा उद्योग आहे. या उद्योगात राज्यात प्रती हेक्टरी रुपये 8 लाख उत्पन्न मिळू शकते. रेशीम उत्पादक अपारंपारिक राज्यामध्ये महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक आहे. इतर नगदी पिकांच्या तुलनेत रेशीम शेतीस पाण्याचा कमी प्रमाणात वापर होतो. रेशीम शेतीमूळे राज्याच्या ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना उत्पन्नाचे शाश्वत साधन मिळून ग्रामीण लोकसंख्येचे शहराकडे होणारे स्थलांतर टाळता येईल. राज्यातील हवामान रेशीम शेतीस पोषक आहे. राज्यातील लहरी हवामानाच्या पार्श्वभुमीवर तुती/मलबेरी हे पीक टिकाव धरु शकते. रेशीम उत्पादनास देशात व विदेशात हमखास मागणी असल्याने उत्पन्नाचा निश्चित स्त्रोत उपलब्ध आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या राज्याच्या धोरणास रेशीम शेती उपयुक्त घटक ठरेल. वन हक्क कायद्याच्या लाभार्थ्यांना दारिद्र्य रेषेच्या वर येण्यासाठी महारेशीम आभियान अत्यंत उपयुक्त ठरेल.

राज्यात दख्खनी मेंढी पासून सुमारे 1400 मेट्रीक टन प्रतीवर्ष लोकरीचे उत्पादन होते. तथापी या लोकरीवर प्रक्रीया करण्यासाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध नसल्याने या लोकरीपासून उत्पादीत होणाऱ्या मुल्यवर्धनाच्या लाभापासून राज्यास व मेंढीपालन करणाऱ्या समुहास वंचीत राहावे लागत आहे. राज्यात उत्पादन होणाऱ्या दख्खनी लोकरीवर, प्रक्रीया करणारे उद्योग स्थापन झाल्यास मेंढीपालनावर अवलंबून असणाऱ्या ग्रामीण लोकसंख्येस हक्काचे रोजगाराचे साधन उपलब्ध होईल व या समुहाचे शहराकडे होणारे स्थलांतर टाळता येईल. याशिवाय महाराष्ट्रामध्ये मोठ्याप्रमाणात बांबू, केळी, अंबाडी, घायपात, नारळ यांचे उत्पादन घेतले जाते. अशा अपारंपारीक गोष्टींपासून तंतूनिर्मीती व त्या तंतूपासून विविध उत्पादन निर्मिती संभव आहे. केळीच्या उत्पादनानंतर केवळ घड सोडून अन्य गोष्टीची विल्हेवाट लावण्यावर खर्च करण्याऐवजी त्यावर प्रक्रीया करुन उत्पन्न मिळाल्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न लगेच वाढेल.

महाराष्ट्राचे नवीन वस्त्रोद्योग धोरण राज्यातील वस्त्रोद्योग क्षेत्राला नव्याने चालना देणारे आहे. यात येत्या 5 वर्षात 10 लक्ष रोजगार निर्मिती तसेच सन 2023 पर्यंत राज्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे लक्ष ठेवण्यात आले आहे. गुंतवणुकदाराना आकर्षित करणारी अनेक प्रोत्साहने, विशेषत: वीज दर अनुदान, अनुसुचीत जाती, जमाती व अल्पसंख्यांक वर्गाला वाढीव भांडवली अनुदान यामुळे या धोरणाच्या कालावधीत रुपये 36 हजार कोटीची गुंतवणुक राज्यात येणे अपेक्षित आहे. गारमेंट, निटींग व होजियरी क्षेत्रातील उद्योगाना सशक्त करण्यासाठी भर दिल्यामुळे महीलांना रोजगाराच्या विपुल संधी उपलब्ध होणार आहेत. यातुन महिलांचे आत्मनिर्भर होणे सहज शक्य होईल. महिला विकासाच्या दृष्टीने हे महत्वाचे पाऊल ठरेल.

वस्त्रोद्योग धोरणचा उद्देश जसा कापूस क्षेत्रा बरोबर रेशीम व लोकर उद्योग क्षेत्राला चालना देण्याचा आहे, तसाच वस्त्रोद्योगात अपारंपारीक धागा निर्मिती, कौशल्य विकास व हरीत उर्जेच्या वापराला प्रोत्साहन देण्याचा सुध्दा आहे. राज्य शासनाची अभिनवता हे या धोरणाचे मुख्य आकर्षण आहे. वस्त्रोद्योग धोरणाची आखणी करताना, कौशल्य विकास तसेच संशोधन व विकास यांना प्राधान्य देण्याचा व्यापक दृष्टिकोन स्विकारण्यात आला आहे. या धोरणांतर्गत राज्यात पहीले वस्त्रोद्योग विद्यापीठ स्थापन करून देशातील या क्षेत्रातील नामांकीत संस्थांच्या सहभागाने कृषि विद्यापीठात जागतिक दर्जाचे संशोधन व विकास प्रकल्प स्थापन करण्यात येतील. यामुळे या क्षेत्रात शैक्षणिक अभ्यासक्रम आखणे व शिकवणे यातील उणीव भरुन निघण्यास मदत होईल.

वस्त्रोद्योग विभागाने प्रथमच वस्त्रोद्योग विकास कोषाची निर्मिती करून वस्त्रोद्योग क्षेत्रासाठी भरीव अर्थसहाय्य करण्याच्या तरतूदीबरोबरच वस्त्रोद्योग विकासासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. सहकारी सूत गिरण्यांकडून परत येणारे भागभांडवल, वस्त्रोद्योग विभागाच्या जमिनी व अन्य मालमत्ता विक्रीतून येणारे उत्पन्न व राज्य शासनाच्या भागभांडवलाचे वा अन्य सुविधांनी पोषीत उद्योगाच्या CSR मधील 50 टक्के वाटा इत्यादीव्दारे हा कोष निर्माण होईल.

सध्या महाराष्ट्रातील एकूण उत्पादित कापसाच्या फक्त 25 टक्के कापूस राज्यातील सूत गिरण्यांवर प्रक्रीयेसाठी जातो. उर्वरीत कापूस इतर राज्यात जातो. त्याच प्रमाणे रंग व प्रक्रीयेसाठी सुध्दा धागा व कच्चे कापड (ग्रे क्लाथ ) इतर राज्यात जातो. ही दरी भरुन काढण्याचा प्रयत्न या धोरणाव्दारे करण्यात येत आहे. यातून पिकणे ते विकणे ही शृंखला येथेच विकसित होईल.

वरील बाबी विचारात घेवून राज्यात उत्पादित होणाऱ्या कापूस, रेशीम, लोकर, अन्य अपारंपारीक तंतूवर व मानव निर्मित तंतूवर प्रक्रिया होवून रोजगार निर्मिती व्हावी या साठी राज्याचे नविन वस्त्रोद्योग धोरण 2018–23 जाहीर करण्यात येत आहे.

## 1. वस्त्रोद्योग धोरणाचा कालावधी :-

सदर वस्त्रोद्योग धोरणाचा कालावधी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून 31 मार्च, 2023 पर्यंत राहील.

## 2. वस्त्रोद्योग धोरण 2018-23 चे उद्दीष्टे :-

2.1. तंतू ते तयार वस्त्र निर्मिती पर्यंत (Fiber to Fashion) वस्त्र निर्मितीतील मुल्यवर्धक उत्पादनाच्या साखळीतील सर्व घटकांची उभारणी करण्यासाठी प्रोत्साहीत करणे.

2.2. वस्त्रोद्योगात 10 लाख नवीन रोजगार निर्मिती करणे.

2.3. कापूस उत्पादक प्रदेशात वस्त्रोद्योगाच्या विकासावर विशेष भर देणे.

2.4. राज्यातील वस्त्रोद्योग जागतिक स्तरावर स्पर्धाक्षम होण्यासाठी प्रोसेसिंग, निटिंग होजीअरी व गारमेंटींग या क्षेत्रावर विशेष भर देणे.

2.5. प्रदुषण मुक्त/पर्यावरण स्नेही (इको-फ्रेंडली) डाईंग व प्रोसेसिंग उद्योगाची उभारणी करणे.

2.6. मलबेरी (तुती) व टसर रेशीम शेती क्षेत्राची वाढ करणे व रेशीम सुताच्या उत्पादनात वाढ करणे, पर्यटन दृष्ट्या रेशीम वृत्ताची निर्मीती करणे.

2.7. पैठणीसारख्या परंपरागत कौशल्यावर आधारीत रेशीम वस्त्रनिर्मीती उद्योगास प्रोत्साहन देणे. अध्यात्मीक रेशीम सारखे ब्रँड तयार करुन प्रसिद्धी व विक्रीसाठी प्रयत्न करणे.

2.8. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या दृष्टीने अपारंपारीक तंतू (बांबू, केळी, अंबाडी, घायपात, मका, काथ्या इत्यादी) निर्मिती व त्यांचा वापर यावर विशेष भर देण्यात येईल.

2.9. लोकर उद्योगावर लक्ष केंद्रीत करून लोकर काढण्यापासून ते लोकरीचे वस्त्रनिर्मीती व विपणनापर्यंतच्या सर्व घटकांवर विशेष भर देणे.

2.10. टेक्नीकल टेक्सटाइल या उभरत्या क्षेत्रावर विशेष भर देणे.

2.11. IIT, SSMIR, WR या सारख्या वस्त्रोद्योग क्षेत्रात संशोधन करणाऱ्या संस्थांकडून संशोधित करण्यात आलेले अत्याधुनिक तंत्रज्ञान उद्योजकांपर्यंत पोचविणे.

## 3. व्याख्या:-

3.1. **अस्तित्वातील प्रकल्प:-** सदर धोरण घोषीत करण्यापुर्वी अस्तित्वात असलेला व या धोरणाच्या कालावधीत प्रकल्पाचे विस्तारीकरण/विविधीकरण/आधुनिकिकरण करणारा प्रकल्प.

3.2. **नवीन प्रकल्प:-** या धोरणाच्या कालावधीत स्थापन झालेला व उत्पादन सुरु करणारा प्रकल्प.

3.3. **विस्तारीकरण प्रकल्प:-** अस्तीत्वातील प्रकल्पाने मागील वर्षीच्या स्थीर ढोबळ भांडवली गुंतवणूकीच्या 25 टक्के आणि प्रकल्पाच्या एकुण उत्पादन क्षमतेपेक्षा 25 टक्के उत्पादन क्षमता वाढ केल्यास सदर बाबीस विस्तारीकरण किंवा विविधीकरण मानण्यात येईल. सदर विस्तारीकरण आणि/किंवा विविधीकरण हे पुढील/मागील प्रक्रीयेसह (forward - Backward) असेल.

3.4. **स्थिर ढोबळ भांडवली गुंतवणुक:-** विस्तारीकरण/विविधीकरण/आधुनिकिकरण करण्यापुर्वी यंत्रसामुग्रीमधील गुंतवणूक आणि/ किंवा वित्तीय संस्था/बँकेकडून आर्थिक सहाय्य मंजूर झालेली गुंतवणूक.

3.5. **आधुनिकीकरण प्रकल्प:-** जूने साधे यंत्रमाग काढून शटललेस रॅपीअर लूम किंवा त्यापेक्षा आधुनिक तंत्रज्ञानावरील आधारीत लूम स्थापन केल्यास.

3.6. **विविधीकरण प्रकल्प:-** एखाद्या वस्त्रोद्योग प्रकल्प उत्पादीत करीत असलेल्या उत्पादनापेक्षा वस्त्रोद्योगाच्या साखळीमधील वेगळे उत्पादन घेण्यासाठीचा प्रकल्प सुरू केल्यास सदर प्रकल्पास विविधीकरण प्रकल्प मानण्यात येईल.

3.7. **प्रकल्प किंमत:-** जमीन, इमारत वं यंत्रसामग्रीची एकत्रीत किंमत.

3.8. **पात्र यंत्रसामुग्री:–** केद्र पुरस्कृत TUFS योजने अंतर्गत पात्र असलेली किंवा राज्य शासनाने घोषीत केलेली . यंत्रसामग्री.

3.9. **पात्र रक्कम:–** केंद्र पुरस्कृत TUFS योजने अंतर्गत भांडवली अनुदानासाठी दीर्घमुदती कर्जाची रक्कम. किंवा राज्य शासनाने घोषीत केलेल्या यंत्रसामग्रीसाठी (कर वजा करून) वित्तिय संस्था अथवा बँकांनी मंजूर केलेल्या दिर्घ मुदती कर्जाची रक्कम.

3.10. **स्व अर्थसहाय्यीत प्रकल्पासाठी पात्र रक्कम:–** केंद्र पुरस्कृत TUFS योजनेच्या निकषानुसार किंवा राज्य शासनाने घोषीत केलेल्या यंत्रसामग्रीची (कर वजा करून) किंमत.

3.11. **भांडवली अनुदानासाठी पात्रता:–** प्रकल्पाची भांडवली अनुदानाची पात्रता ही प्रकल्पाची स्थापीत उत्पादन क्षमता व प्रत्यक्षातील वार्षिक उत्पादन यावर निश्चीत करण्यात येईल.

3.12. **कंपोझीट युनिट:–** स्पिनिंग, विव्हिंग, निटींग, प्रोसेसिंग, गारमेंटींग यापैकी कोणतेही किमान दोन प्रक्रीया उद्योग करणारा प्रकल्प.

3.13. **टेक्नीकल टेक्सटाईल्स:–** असे वस्त्रोद्योग उत्पादन ज्यांचा मुख्य उद्देश हा केवळ तयार कापड निर्मिती नसून त्याच्या तांत्रिक व इतर वैशिष्ट्यांमुळे औद्योगीक, संरक्षण, संशोधन, घरगुती व इतर उद्योगात वापर करण्यात येतो. या उत्पादनाचीं वैशिष्टे, कापडाचा अंतिम वापर विचारात घेऊन त्याचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात येते.

(1) ग्रोटेक (2) बिल्डटेक (3) क्लोथटेक (4) जीओटेक

(5) होमटेक (6) ईन्डटेक (7) मेडीटेक (8) मोबाईलटेक

(9) इकोटेक (10) पॅकटेक (11) प्रोटेक (प्रोटेक्टीव्ह टेक्सटाईल) (12) स्पोर्टटेक

(13) डिफेंन्सटेक (14) केंद्र शासनाच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाकडून वेळोवेळी घोषीत केलेली उत्पादने.

3.14. **TUF योजना–** केंद्र शासनाची (A-TUFS) Amended Technology up Gradation Funds Scheme किंवा त्यानंतर केंद्र शासनाने वेळोवळी सुधारणा केलेली योजना.

## 4. वस्त्रोद्योग धोरण 2018 – 23 मध्ये समाविष्ठ वस्त्रोद्योग घटक

4.1. Cotton Ginning and pressing

4.2. Spinning /Silk Reeling and Twisting /Integrated Silk Park/ Synthetic Filament /Yarn Texturing, Crimping Twisting

4.3. Weaving power loom

4.4. Technical Textile, Non-Woven and converters of non-wovens

4.5. Knitting/ Hosiery/ Garment/ Apparel Made Up

4.6. Processing of Fibre / Yarn /Fabrics / Garments /Made-Ups

4.7. Processing of Non-Conventional fibre / Yarn / Fabrics / Garments /Made-Ups (Bamboo, Banana, coir, Hemp, Ghayapat , Maize etc.)

4.8. Expansion of existing textile units

4.9. Textile Parks/ processing park.

4.10. Energy saving process control equipment's for various textile sectors.

4.11. Skill Development ctivities.

4.12. Wool sector (i.e. scouring, combing, spinning {worsted, shoddy and woollen} and weaving) carpet sector.

4.13. Stand alone spinning

4.14. Spinning with matching downstream capacity

4.15. Manufacturing Viscose filament yarn / viscose staple fibre

4.16. Independent weaving preparatory

4.17. Embroidery on stand alone basis

4.18. Composite Up gradation (i.e., units going for up gradation in spinning, weaving / knitting and processing)

4.19. Multi-activities (Units with two or more activities simultaneously except composite up gradation mentioned above)

4.20. Composite Unit

4.21. Other Units of textile industry other than above

## 5. वस्त्रोद्योग धोरण 2011–17 अंतर्गत योजना

ज्या प्रकल्पांनी वस्त्रोद्योग धोरण 2011–17 अंतर्गत अर्ज केले आहेत (Form- भरले आहेत). त्या प्रकल्पांना त्या धोरणाखाली असलेल्या सवलती प्रकल्पाच्या लाभाच्या कालावधी पर्यंत (Beneficiary Period) सुरू राहतील.

## 6. वस्त्रोद्योग धोरण 2011–17 चा कालावधीत वाढ.

दि. 18 एप्रिल 2016 ते 15,फेब्रुवारी 2018 पर्यंतच्या कालावधीत दिर्घ मुदती कर्ज मंजूर झालेले प्रकल्प शासन निर्णय क्रमांक: धोरण 2015/प्र.क्र. 364 /टे–5, दि. 18 एप्रिल, 2016 अन्वये सवलतीस पात्र असतील.

तसेच ज्या स्व–अर्थसहाय्यीत वस्त्रोद्योग प्रकल्पांनी दि. 2 डिसेंबर 2015 ते 15, फेब्रुवारी 2018 या कालावधीत यंत्रसामुग्रीच्या खरेदीचे आदेश दिले असतील असे प्रकल्प शासन निर्णय दि. 2 डिसेंबर 2015 अन्वये सवलतीसाठी पात्र असतील.

## 7. वस्त्रोद्योगाच्या विकासासाठी वस्त्रोद्योग धोरण 2018–23 अंतर्गत खालील योजना राबविण्यात येतील.

### 7.1. सहकारी सूतगिरण्या :–

7.1.1. सहकारी तत्वावर चालविण्यात येणाऱ्या सुतगिरण्यांकरीता भाग भांडवलाची योजना ही फक्त कापूस उत्पादक जिल्ह्यामध्ये राबविण्यात येईल.

7.1.2. ज्या तालूक्यामध्ये उत्पादित होणाऱ्या कापसापैकी 50 टक्के पेक्षा कमी कापूस सुतगिरण्यांसाठी वापरले जाते फक्त अशाच तालूक्यात सदर योजना राबविण्यात येईल.

7.1.3. शासकीय भाग भांडवलाचे दायित्व कालबद्धपणे पुर्ण होण्याच्या दृष्टीने सहकारी तत्वावरील सुतगिरण्यांचे स्व–भागभांडवल, राज्य शासनाचा भांडवली सहभाग व वित्तिय संस्थांचे कर्ज 10 : 30 : 60 या प्रमाणात राहील. सूतगिरणीचे स्व–भाग भांडवल वाढविण्याबाबत विचार करण्यात येईल.

7.1.4. मानव संसाधन विकासाच्या दृष्टीने सहकारी सुतगिरण्यांना व्यवस्थापकीय संचालक पदावर शासकीय अधिकारी प्रतिनियुक्तीने घेता येईल. या साठी कार्यपध्दती निश्चित करण्यात येईल. कौशल्य विकास, क्षमता वृध्दी, व्यवस्थापन या दृष्टीने प्रशिक्षण कार्यक्रम आखण्यात येईल.

7.1.5. सहकारी सूत गिरण्यांना त्यांची कार्यक्षमता, ऊर्जा बचत, खर्चातील बचत, लेखापरिक्षा वर्ग, नफ्यातील वाढ, तोटा कमी करणे, शासनाच्या देण्याची परत फेड इत्यादी निकषाच्या आधारे प्रोत्साहन/बक्षीस देण्याची योजना तयार करण्यात येईल. अशा बक्षीस मिळालेल्या संस्थांना शासनाच्या योजना मंजूर करण्यास, योजनेचे लाभ, निधी देण्यास प्राधान्य देण्यात येईल.

7.1.6. सहकारी सुतगीरण्यांनी आधुनिक यंत्रसामग्री व सौर ऊर्जेचा वापर करावा यासाठी आवश्यक ती प्रशासकीय उपाययोजना करण्यात येईल.

7.1.7. **एक वेळची निर्गमन योजना (ONE Time Exit Policy)**– सहकारी यंत्रमाग संस्था व सहकारी सुतगीरण्यांनी राज्यशासनाचे भागभांडवल, कर्ज व त्यावरील व्याजाची रक्कम परत करण्याची तयारी दर्शविल्यास त्यांना संस्थेचे खाजगिकरण करण्याची परवानगी देण्यात येईल. जमिनीच्या औद्योगिक वापरात बदल केल्यास प्रचलित नियमानुसार शासनास रक्कम अदा करावी लागेल.

**7.2. यंत्रमाग :–**

राज्याच्या वस्त्रोद्योगात यंत्रमाग उद्योगाचा मोठा वाटा असून देशातील यंत्रमागापैकी 50 टक्के सुमारे 13 लाख यंत्रमाग राज्यात आहेत. राज्यात असणाऱ्या एकुण यंत्रमागापैकी 80 टक्के म्हणजेच सुमारे 10 लाख साधे यंत्रमाग आहेत. कापडाची गुणवत्ता व उत्पादनात वाढ, विज वापरातील बचत, कमी उत्पादन खर्च व देशांतर्गत व जागतीक बाजारपेठेत स्पर्धाक्षम होण्यासाठी साध्या यंत्रमागचे आधुनिकीकरण करण्यासाठी केंद्र शासनाच्या योजनांना सहाय्यक योजना म्हणून खालील योजना राबविण्यात येतील.

7.2.1 **साध्या यंत्रमागाच्या आधुनिकीकरणासाठी राज्य योजना –**

केंद्र पुरस्कृत Pilot scheme of IN-SITU Up gradation of Plain Power loom for SSI Sector अंतर्गत साध्य यंत्रमागांना जोडतंत्र प्रदान करण्याकरीता केंद्र शासनाकडून ज्या यंत्रमागधारकांना अर्थसहाय्य प्राप्त होईल अशा यंत्रमाग धारकांना राज्य शासन खालील प्रमाणे अर्थसहाय्य देईल.

**तक्ता क्रमांक –1**

| क्र. | आधुनिकीकरणाचे प्रकार | प्रती यंत्रमाग अनुदानाचा दर | | |
|---|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण प्रवर्ग (35 टक्के) | अनुसूचीत जाती (20 टक्के) | अनुसूचीत जमाती (8 टक्के) |
| 1. | साध्या यंत्रमागाचे सेमी ऑटोमेटीक शटललूम करणे. | रू. 10,000/– | रू. 6,800/– | रू.2,400/– |
| 2. | सेमी ऑटोमेटीक शटललूमचे शटललेस रॅपीअर लूम करणे. | रू.17,500/– | रू.10,000/– | रू.4,000/– |
| 3. | साध्या यंत्रमागाचे शटलेस रॅपीअर लूम करणे. | रू.28,000/– | रू.16,000/– | रू.6,400/– |

सदर योजना केंद्र शासनाच्या योजनेच्या अटी व शर्ती नुसार राबविण्यात येईल.केंद्र शासनाकडून लाभार्थ्यांची माहिती प्राप्त झाल्यानंतर लाभार्थ्यांना अर्थसहाय्य देण्याचे धोरण अवलंबिण्यात येईल. केंद्र शासनाने योजनेत सुधारणा केल्यास राज्य शासनही त्यानुसार या योजनेत सुधारणा करील.

7.2.2. **यंत्रमागासाठी अन्य योजना :–**

7.2.2.1. केंद्र शासनाकडून यंत्रमागाकरीता ग्रुप वर्क शेड योजना, यार्न बँक योजना, सामायिक सुविधा योजना (CFC- Decision center/studio, Testing Facilities, Training center, Information Cum trade Centre Common raw material/Yarn/Sales depot, water treatment plant for industrial use, Dormitory Workers residential space, Common pre weaving facilities Viz- yarn dying warping sizing twisting etc., post weaving facilities viz- processing etc.) सौर ऊर्जा योजना इत्यादी योजनां राबविण्यात येतात. राज्य शासनाकडून केंद्र शासनाच्या योजनांना पुरक योजना तयार करण्यात येतील. या योजना केंद्र शासनाच्या योजनेच्या अटी व शर्ती नुसार राबविण्यात येतील. त्याचप्रमाणे केंद्र शासनाकडून लाभार्थ्यांची माहिती प्राप्त झाल्यानंतर अनुदान देण्याचे धोरण अवलंबविण्यात येईल.

**7.3. वस्त्रोद्योग धोरण 2011–17 अंतर्गत येणाऱ्या योजनांचे प्रशासकिय सुलभिकरण :–**

7.3.1. TUFS संलग्न व TUFS असंलग्न योजनेचे एकत्रीकरण – टफ योजनेंतर्गत दिले जाणारे अनुदान हे बदलत्या व्याजदरामूळे अंमलबजावणीस क्लिष्ट असल्याने कार्यसुलभतेच्या दृष्टीकोनातून (Ease of Doing Business) निर्णय घेण्यात येईल.

7.3.2. प्रशासकीय दृष्ट्या सोयीचे होण्याकरीता तथा वेळेचा अपव्यय टाळण्याकरीता सुतगिरणी व यंत्रमागाचे बांधकामास आणि यंत्रसामुग्री खरेदीस मान्यता देण्याबाबतच्या अधिकाराचे विकेंद्रीकरण करण्यात येईल.

7.3.3. **वस्त्रोद्योग धोरणा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना ऑनलाईन करणे –**

शासनाचे प्रशासकिय सुलभिकरण व Ease of doing business चे धोरण विचारात घेऊन वस्त्रोद्योग धोरणांतर्गत योजनांचे लाभ देण्याची प्रक्रीया सुलभ करण्यासाठी सदर योजनांचे ऑनलाईन व पेपरलेस संनियंत्रण करण्याचे धोरण अवलंबिण्यात येईल.

**7.4. व्याज अनुदाना ऐवजी भांडवली अनुदान** (Capital Subsidy in lieu of Interest Subsidy)-

सन 2011–17 वस्त्रोद्योग धोरणाच्या कालावधीत राबविण्यात आलेली नवीन, विस्तारीकरण, विविधीकरण/ आधुनिकीकरण (New, Expansion Diversification/Modernization) प्रकल्पांना व्याज अनुदाना ऐवजी भांडवली अनुदान देण्याची योजना काही सुधारणासह नवीन वस्त्रोद्योग धोरणात चालू ठेवण्यात येईल..

विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्र या कापूस उत्पादक मागास भागात प्रक्रीया उद्योग स्थापण करणाऱ्या प्रकल्पांना अतिरीक्त भांडवली अनुदान देण्यात येईल. वस्त्रोद्योगाच्या विविध क्षेत्रांना देण्यात येणाऱ्या भांडवली अनुदानाचा दर व अनुदान देण्याचा कालावधी खालील प्रमाणे राहील.

Government of Maharashtra

## तक्ता क्रमांक –2–

| वस्त्रोद्योगाचा प्रकार | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | प्रोसेसींग (यार्न, फॅब्रीक, प्रींटींग), टेक्नीकल टेक्सटाईल, निटींग, होजीअरी व गारमेंटिंग* | कंपोझीट युनीट ** | सूतगिरणी, जिनिंग प्रेसिंग | जूने साधे यंत्रमाग काढून शटललेस रॅपीअर लूम किंवा त्यापेक्षा आत्याधुनिक तंत्रज्ञानावरील आधारीत लूम स्थापन केल्यास. (Modernization of plain powerlooms) | अद्यावत तंत्रज्ञानावर आधारीत नविन यंत्रमाग (साधे यंत्रमाग वगळून), रकाना क्र. 2 ते 5 व्यतिरीक्त विव्हींग, प्रीप्रेटरी, वार्पींग, सायझींग, कोनींग, ट्विसटीं, डब्लींग, टीएफओ सह अन्य वस्त्रोद्योग घटक |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| सर्व साधारण प्रवर्गातील घटकांना अनुदान | **पात्र रकमेच्या 40 %** | **पात्र रकमेच्या 35 %** | **पात्र रकमेच्या 25 %** | **पात्र रकमेच्या 25 %** | **पात्र रकमेच्या 25 %** |
| अनुसूचीत जाती/ अनुसूचीत जमाती/ अल्पसंख्यांक समाजाच्या वस्त्रोद्योग प्रकल्पांना अनुदान | **45 %** | **40 %** | **30 %** | **30 %** | **30 %** |
| अपारंपारीक धागा निर्माण करणे व त्यापासून वस्त्र व अन्य उत्पादन बनविणे – अतिरिक्त भांडवली अनुदान. | **10 %** | **10 %** | **10 %** | – | – |

**विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील प्रकल्पांना खालील प्रमाणे अतिरीक्त अनुदान देय राहील.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अतिरीक्त भांडवली अनुदान | **20 %** | **10 %** | **10 %** | **10 %** | **10 %** |
| एखाद्या प्रकल्पाने पुढील/मागील प्रक्रीया प्रकल्प (Forward/Backward Integration) सुरु केल्यास अतिरीक्त | **5 %** | – | **5 %** | – | **5 %** |
| ज्या तालुक्यात सुतगीरणी नाही अश्या तालूक्यात सुतगीरणी स्थापण केल्यास अतिरीक्त अनुदान. | – | **5 %** | – | – | – |
| ज्या तालुक्यात सहकारी अथवा खाजगी सुतगीरणी नाही अशा तालुक्यात नविन कंपोझिट युनिट सुरु केल्यास 5 टक्के | – | **5 %** | – | – | – |

*प्रोसेसींग प्रकल्पातील ETP/CETP /ZLD वरील बांधकामावरील खर्च हा भांडवली अनुदानाकरीता पात्र असेल.

**कंपोझीट युनिट– रकाना क्र. 2 मधील बाबी वगळता अन्य प्रक्रीयेसाठी 35% व रकाना क्र. 2 मधील बाबीचा समावेश असल्यास तेवढ्या बाबी पुरते 40% अनुदान.

- रूपये 500 कोटी किंवा त्यापेक्षा अधिक गुंतवणूक असणाऱ्या प्रकल्पास 5 टक्के अतिरीुक्तभांडवली अनुदान व तो त्या तालुक्यातील पहिला असा प्रकल्प असल्यास आणखी 5 टक्के असे एकुण 10 टक्के भांडवली अनुदान अतिरीक्त स्वरू पात देय होईल.

**अनुदान वितरणाचा कालावधी**– वस्त्रोद्योग प्रकल्पांना भांडवली अनुदान प्रकल्प उत्पादनात आल्यानंतर खालील प्रमाणे तीन हप्त्यात देण्यात येईल.

(1) पहिला हप्ता – 12 महिन्यांनतर पात्र रकमेच्या 30 टक्के

(2) दुसरा हप्ता – 24 महिन्यांनतर पात्र रकमेच्या 30 टक्के

(3) तिसरा हप्ता – 36 महिन्यांनतर पात्र रकमेच्या 40 टक्के

प्रस्तुत योजनेचा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकास किंवा त्यानंतर दि. 31 मार्च, 2023 पर्यंत केंद्र पुरस्कृत TUFS योजनेच्या निकषानुसार यंत्रसामुग्रीसाठी दिर्घ मुदती कर्ज मंजूर केलेले तसेच जिनिंग व सुतगीरणी बाबत दि. 31 मार्च 2023 पर्यंत बँका/वित्तीय संस्थांनी दिर्घमुदती कर्ज मंजूर केलेले आणि राज्य शासनाच्या संकेतस्थळावर Form– भरला असेल असे प्रकल्प या योजने अंतर्गत अनुदानासाठी पात्र असतील.

## 7.5. स्व–अर्थसहाय्यीत प्रकल्पांना भांडवली अनुदान:–

7.5.1. स्व–अर्थसहायीत नविन/विस्तारीकरण/विविधीकरण/आधुनिकीकरणाच्या वस्त्रोद्योग प्रकल्पांना वरील व्याज अनुदानाऐवजी भांडवली अनुदान योजनेप्रमाणे भांडवली अनुदान देण्यात येईल.

7.5.2. स्व– अर्थसहायीत प्रकल्पांना विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील वस्त्रोद्योग प्रकल्पांना देय होणारे अतिरिक्त भांडवली अनुदान देण्यात येईल.

7.5.3. अनुसूचीत जाती / जमाती/ अल्पसंख्यांक समाजाच्या वस्त्रोद्योग प्रकल्पांना वरील व्याज अनुदाना ऐवजी भांडवली अनुदान, या योजनेप्रमाणे भांडवली अनुदान देण्यात येईल.

7.5.4. शासन निर्णय दि. 02/12/2015 व दि.18/12/2015 नुसार स्व–अर्थसहाय्यीत प्रकल्पांना भांडवली अनुदान देण्याच्या योजनेतील अटी व शर्ती या योजनेसही लागू राहतील व आवश्यकतेनुसार त्यात सुधारणा करण्यात येतील.

Government of Maharashtra

## 7.6 टेक्सटाईल पार्क्स:–

7.6.1. केंद्र शासनाच्या SITP योजने अंतर्गत मंजूर करण्यात येणाऱ्या प्रकल्पांना राज्य शासनाकडून रू. 9.00 कोटी किंवा प्रकल्प किंमतीच्या 9 टक्के यापैकी जे कमी असेल तेवढे अनुदान देण्याची अस्तित्वातील योजना (शासन निर्णय दि. 25/05/2012) यापूढेही सूरू राहिल.

7.6.2. राज्य शासनाकडून यवतमाळ, वर्धा, अमरावती, बुलढाणा, जळगाव, औरंगाबाद, जालना, परभणी, बीड व नांदेड, या जिल्ह्यात महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळाकडून इंटीग्रेटेड टेक्स्टाईल हब/पार्क स्थापन करण्यात येतील. त्यामध्ये रस्ते, पाणी, विज इत्यादी आवश्यक त्या पायाभूत सुविधांसह परीक्षण प्रयोग शाळा (Testing Lab), CETP यांचा समावेश असेल. या मेगा इंटीग्रीटेड टेक्सटाईल हब साठी प्रत्येक ठिकाणी किमान 100 हेक्टर जमीन विकसीत करण्यात येईल.

7.6.3. वर नमुद केलेल्या जिल्ह्यांशिवाय विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातही आवश्यकतेनूसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (MIDC) वरीलप्रमाणे टेक्सटाईल पार्क स्थापन करण्यात येतील.

7.6.4. इचलकरंजी (हातकणंगले) व सोलापूर येथे महाराष्ट्र राज्य औद्योगीक महामंडळाकडून टेक्सटाईल पार्क्स/हब स्थापन करण्यात येतील.

## 7.7 प्रोसेसिंग (Pre post):

7.7.1. केंद्र पुरस्कृत IPDS योजने अंतर्गत मंजूर प्रकल्पांना राज्याकडून प्रकल्प किंमतीच्या 25 टक्के किंवा 37.50 कोटी यापैकी जी रक्कम कमी असेल ती देण्याची अस्तित्वातील योजना (शासन निर्णय दि. 10/02/2015) यापुढेही सुरू राहील.

7.7.2. प्रोसेसींग प्रकल्पातील ZLD-ETP/CETP साठी लागणाऱ्या सर्व प्रकारच्या यंत्रसामग्रीवर भांडवली अनुदान देण्यात येईल.

7.7.3. MIDC कडून सागरी किनारपट्टयांवर CETP सह प्रोसेसिंग पार्क उभारण्यात येतील.

7.7.4. प्रोसेसींग प्रकल्पांना हार्ड वेस्ट डीस्पोझलसाठी संबधीत जिल्ह्यात जमीन उपलब्ध करुन देण्यात येईल.

7.7.5. इचलकरंजी, मालेगाव व भिवंडी या ठिकाणी महाराष्ट्र राज्य औद्योगीक विकास महामंडळाकडून प्राथम्याने ZLD-ETP/CETP सहीत प्रोसेसिंग पार्क उभारण्यात येतील.

7.7.6. प्रोसेसींग प्रकल्पातील ZLD-ETP/CETP प्रकल्प चालविण्याचा व हार्ड वेस्टेज डिस्पोझलचा खर्चही मोठा असल्याने ZLD-ETP/CETP असणाऱ्या प्रोसेसिंग उद्योगांना सवलतीच्या दराने वीज देण्यात येईल.

7.7.7. प्रायोगीक तत्वावर कमी पाणी अथवा पाणी विरहीत डाईंग प्रक्रीया प्रकल्प स्थापण करण्याकरीता ससमिरा (SSMIR) आणि IIT या सारख्या संस्थाना अर्थसहाय्य देण्यात येईल.

7.7.8. प्रोसेसीग़ प्रकल्पासाठी पाण्याची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता असल्याने या प्रकल्पासाठी पाण्याचे आरक्षण ठेवण्यात येईल.

## 7.8 निटींग होजीअरी व गार्मेंटींग:–

7.8.1. MIDC कडून विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात/तालुक्यात आवश्यकतेनुसार उद्योजकांना निटींग, होजिअरी, गार्मेंटींग उद्योग उभारण्यासाठी PLUG PLAY सुविधा असलेली इमारत उपलब्ध करून देण्यात येईल.

7.8.2. या इमारतीत सामायीक सुविधा केंद्र, कामगार प्रशिक्षण केंद्र इत्यादी सुविधा असतील. सामायीक सुविधा केंद्र, कामगार प्रशिक्षण केंद्र इत्यादी सुविधा या इमारतीतील गाळे धारकांची संघटना/सहकारी सोसायटी/खाजगी मर्यादीत कंपनी इत्यादींकडून चालविण्यात येतील

7.8.3. ग्रामीण भागात स्त्रियांना त्यांच्या गावातच व त्यांच्या सोयीनुसार रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने विकेंद्रीत गारमेंट उद्योग उभारण्यासाठी शासन योजना तयार करील.

7.8.4. सोलापूर येथील नरसिंगजी गिरजी मिल व नागपूर येथील एम्प्रेस मिलच्या जमिनीची विक्री करुन या विक्रीतून येणाऱ्या निधीतून सोलापूर व नागपूर येथे गार्मेट पार्क स्थापन करण्यात येतील. उर्वरीत निधी वस्त्रोद्योग विकास कोषात जमा करण्यात येईल.

7.8.5. उद्योजक व उद्योजकांच्या संघटना, सेवाभावी संस्था, केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत पात्र असणाऱ्या संस्थांकडून केंद्र शासनाच्या कौशल्यविकास व सामायिक सुविधा केंद्र, राज्य शासनाची प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता विकास या योजनेद्वारे कामगार प्रशिक्षित करण्यात येतील. सदर प्रशिक्षणात HARD, SOFT तसेच Life Competencies या तीन्ही बाबींचा समावेश असेल.

## 7.9. मेगा प्रोजेक्ट्स:

7.9.1. उद्योग विभागाकडून राबवीण्यात येणाऱ्या सामुहिक प्रोत्साहन योजने अंतर्गत सर्व वर्गीकृत तालूक्यात रू. 100 कोटी भांडवली गुंतवणूक अथवा 250 रोजगार निर्मिती करणाऱ्या नवीन किंवा विस्तारीकरण करणाऱ्या वस्त्रोद्योग प्रकल्पांना मेगा प्रोजेक्ट्सचा दर्जा व प्रोत्साहने देण्यात येतील.

7.9.2. एकाच तालूक्यातील वेगवेगळ्या ठिकाणी स्थापन केलेल्या वस्त्रोद्योग प्रकल्पांची गुंतवणूक अथवा रोजगार एकत्रीतपणे विचारात घेऊन मेगा प्रोजेक्ट्सचा दर्जा व प्रोत्साहने देण्यात येतील.

## 7.10. हरीत उर्जा वापरासाठी प्रोत्साहन अनुदान –

7.10.1. सौर ऊर्जा व पवन ऊर्जेच्या माध्यमातून पर्यावरण पुरक हरीत उर्जेवर चालणारे वस्त्रोद्योग प्रकल्प स्थापन केल्यास वस्त्रोद्योग प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्यात येईल.

7.10.2. वीज अनुदानाचा बोजा कमी करण्यासाठी टेक्टाईल क्षेत्रात सुतगिरण्या, यंत्रमाग तथा कापड उद्योग हे हरीत उर्जेचा प्रकल्प उभारण्यास तयार असल्यास त्यांना प्रकल्प उभारणीस अनुदान देण्याच्या अनुषंगाने MEDA च्या सहकार्याने योजना आखण्यात येईल.

## 7.11. विज दर सवलत–

7.11.1. वस्त्रोद्योग घटकांना ओपन ॲक्सेसवर लागणारी क्रॉस सबसिडी यापुढे लावण्यात येणार नाही.

7.11.2. अपारंपारिक उर्जा (सौर, पवन इ.) स्त्रोतांचा वापर करणाऱ्या प्रकल्पांबाबत ऊर्जा विभाग वहन खर्च वगळता अन्य अधिभार लावणार नाही.

7.11.3. सहकारी सूतगिरणीला वीजदरात प्रति युनिट रु. 3/– इतकी सूट तीन वर्षांकरिता देण्यात येईल. तोवर त्यांनी अपारंपारिक उर्जा प्रकल्प उभारुन आपली भविष्यातील गरज पूर्ण करावी. याबाबत एक मेगावॅटची मर्यादा नेट मीटर योजनेतून काढून टाकण्यात येत आहे. ही प्रतियुनिट रुपये 3/– ची सवलत ओपन ॲक्सेसकरिता लागू होणार नाही. दिल्या जाणाऱ्या सुटीबाबत दरवर्षी आढावा घेण्यात येईल व प्रती वर्ष रु. 150.00 कोटीपेक्षा जास्त अधिभार होणार नाही या अनुषंगाने ही सवलत कमी करण्यात येईल.

7.11.4. 200 अश्वशक्तीपेक्षा अधिक दाबाच्या यंत्रमागांना रु. 2/– प्रति युनिट वीज दर सवलत देण्यात येईल.

7.11.5. यंत्रमागांना 27 अश्वशक्तीपेक्षा कमी, 27 ते 200 व 200 पेक्षा जास्त अश्वशक्तीपेक्षा अधिक दाबाच्या घटकांना जे लाभ मिळतात तेच लाभ त्या त्या क्षमतेनुसार निटींग, होजीअरी आणि गार्मेंटीग घटकांना सुध्दा मिळतील.

7.11.6. सहकारी सूत गिरणी वगळता सुतगिरणी, प्रक्रीया उद्योग व अन्य सर्व वस्त्रोद्योग घटक जे 107 अश्वशक्तीपेक्षा अधिक दाबाचा वापर करतात त्यांना रु. 2/– प्रति युनिट वीज दर सवलत देण्यात येईल.

7.11.7. 27 HP पेक्षा कमी दाबाच्या यंत्रमाग धारकाचे प्रति युनिट वीज दर हे 27 HP ते 107 HP दाबाच्या युनिट धारकापेक्षा जास्त दिसते. ती विसंगती दूर करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्यात येईल.

7.11.8. पारंपारीक व अपारंपारीक उर्जेचा एकत्रीत वापर करीत असताना लोड फॅक्टर ठरविताना दोन्ही उर्जा स्त्रोताचा वापर विचारात घेण्यात येईल.

7.11.9. सहकारी सुतगिरण्यां तीन वर्षात सौर उर्जेवर चालविण्यासाठी अनुदानाचे प्रमाण ठरविण्यासाठी महासंचालक महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (MEDA) व संचालक वस्त्रोद्योग यांची समिती गठीत करण्यात येईल.

## 8. जाहिरात,प्रसिध्दी व मार्केटींग:

8.1.1. विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रात राज्य शासनाकडून MIDC मार्फत टेक्सटाईल पार्क स्थापन होणाऱ्या जिल्ह्यात जिनींग प्रेसींग उद्योजक, कापड व्यापारी, उद्योजक यांना वस्त्रोद्योग धोरणाची माहिती देण्यासाठी जिल्हास्तरावर उद्योग विभाग व वस्त्रोद्योग विभाग व केंद्र शासनाचे वस्त्रोद्योग आयुक्त, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मेळावे, चर्चासत्रे आयोजीत करण्यात येतील.

8.1.2. पंजाब, राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश, तामिळनाडू व आंध्रप्रदेश या राज्यातील मोठे उद्योजक राज्यात आकर्षित व्हावेत यासाठी वस्त्रोद्योग विभाग व MIDC संयुक्तपणे त्या राज्यात वर्कशॉप आयोजीत करतील.

8.1.3. सर्व प्रकारच्या प्रसिध्दी माध्यमाचा उपयोग करुन वस्त्रोद्योग धोरणास पुरेशी प्रसिध्दी देण्यात येईल.

8.1.4. राज्य स्तरावरील व देशपातळीवरील वस्त्रोद्योग संघटना कडून आयोजीत चर्चासत्रे, मेळावे, राज्य देश आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रदर्शने यांना उत्तेजन देण्यात येईल.

8.1.5. राज्यात तयार होणारे कापड व तयार कपडे यांना जागतीक स्तरावर बाजारपेठ मिळावी यासाठी राज्य/देश पातळीवरील वस्त्रोद्योग संघटनाना फॅशन शो इत्यादी साठी उत्तेजन देण्यात येईल.

8.1.6. ग्रामीण भागातील उद्योजकांना वस्त्रोद्योग धोरणामधील सुविधांची माहिती मिळावी व वस्त्रोद्योगाच्या वाढीस चालना मिळेल यासाठी ग्रामसभेमध्ये वस्त्रोद्योग धोरणाचे वाचन करण्यात येईल.

8.1.7. वस्त्रोद्योग धोरणाचा समावेश राज्याच्या मुख्य धोरणात्मक योजनांमध्ये समावेश करण्यात येईल.

8.1.8. एकाच दर्जाचा/प्रकारचा/विशिष्ट कंपनीचा कापूस स्पिनिंग उद्योगासाठी उपलब्ध व्हावा म्हणून ब्रॅन्डेड कापूस गाठी तयार करण्यासाठी जिनिंग प्रेसिंग उद्योगास प्रोत्साहने देण्यासाठी योजना तयार करण्यात येईल.

8.1.9. महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, खादी व ग्रामोद्योग मंडळ, क्वायर बोर्ड, इत्यादी संस्थाच्या सहाय्याने हातमाग व अपारंपारीक सूत व त्यापासून निर्माण होणाऱ्या वस्तूंच्या वितरण, जाहिरात, प्रसिध्दी, मार्केटींग, ब्रँडीग साठी योजना तयार करील व त्यासाठी सर्व संबधीत संस्थांची संचालक वस्त्रोद्योग यांचे अध्यक्षते खाली समन्वय समिती स्थापन करण्यात येईल.

### 8.2. हातमाग विकास:

राज्यातील हातमाग उद्योगाच्या विकासासाठी केंद्र शासन पुरस्कृत योजनांकरीता आवश्यक असलेल्या राज्य हिश्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याचे व आवश्यक तेथे केंद्र शासनाच्या योजनेस राज्यशासनाची पुरक योजना राबविण्याचे धोरण पुढे सुरु ठेवण्यात येईल. उच्च दर्जाच्या हातमाग वस्त्राची उच्चभ्रु समाजाची देशात व विदेशात मोठी मागणी आहे. या मागणीचा लाभ हातमाग वस्त्रोद्योगाला व्हावा यासाठी शासनाकडून NIFT सारख्या संस्थाच्या सहयोगाने हातमागाचे नविन डीझाईन, फ्युजन (Fusion) इ. विकसीत करून हातमाग व्यवसायात तरूण विणकरांना आकर्षीत करण्यासाठी योजना आखण्यात येतील.

महाराष्ट्र राज्य हातमाग विकास महामंडळाचे बळाकटीकरण करण्यासाठी शासनाने दिलेल्या कर्जाचे व त्यावरील व्याजाचे शासकीय भागभांडवलात रूपांतर करण्यात येईल.

### 8.3. प्रशिक्षण:

केंद्र शासनाच्या कौशल्य विकासासाठी असलेल्या ISDS या योजनेचा पुरेपूर उपयोग राज्यातील वस्त्रोद्योगाने घ्यावा या साठी केद्र शासनामार्फत समाईक सुविधा केंद्र (CFC) या योजने अंतर्गत प्रशिक्षण केंद्रासाठी निधी उपलब्ध उपलब्ध झाल्यावर राज्याकडूनही निधी उपलब्ध करून देण्याची योजना तयार करण्यात येईल.

वस्त्रोद्योगाच्या गरजा विचारात घेवून प्रशिक्षीत मनुष्यबळ उपलब्ध होण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थाकडून आवश्यक ते अभ्यासक्रम सुरु करण्यात येतील. कामगारांच्या सर्वांगिण विकासासाठी त्रिस्तरीय प्रशिक्षण (Hard

Competencies 2. Soft Competencies 3. Life Competencies) हे संबंधित क्षेत्रातील तज्ञ मार्गदर्शकांकडून करण्यासाठी शासन योजना तयार करील.

वस्त्रोद्योग, सहकारी सूत गिरण्या यांचेसाठी मानव संसाधन, उर्जा बचत, समय व्यवस्थापन, पुरवठा, प्रबोधन कोशल्य, ISO नामांकन इत्यादी कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरु करण्यात येतील.

## 8.4. संशोधन व विकास:

8.4.1. राज्यातील वस्त्रोद्योग, रेशीम व लोकर उद्योगाचा विकास करण्यासाठी आवश्यक ते संशोधन, विकास व अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी भारतातील IIT, SSMIR, WR या सारख्या तंत्रविज्ञान संस्था समवेत सामंजस्य करार करण्यात येतील.

8.4.2. वस्त्रोद्योगाचा विकास/बळकटीकरण करण्याकरीता कृषि, उच्च तंत्रशिक्षण व कौशल्य विकास विभागाशी विचार विनिमय करुन केंद्र शासनाच्या सहकार्याने राज्यात राज्य वस्त्रोद्योग विद्यापीठसुरु करण्यात येईल. या विद्यापिठात प्रमाणपत्र, पदवी, पदविका, पदव्युत्तर पदवी, इत्यादी वस्त्रोद्योगाशी संबधीत सर्व प्रकारचे अभ्यासक्रम असतील.

## 8.5. रेशीम विकास:

रेशीम उद्योग हा कृषि व वनसपंत्तीवर आधारीत रोजगाराची प्रंचड क्षमता असलेला उद्योग आहे. या उद्योगाच्या माध्यमातून ग्रामिण भागातील जनतेचा आर्थिकस्तर व शहरी भागाकडे होणारे स्थलांतर थांबविणे शक्य आहे. समाजातील सर्व वर्गातील व वयोगटातील लोकांना रोजगाराची संधी देणारा हा एकमेव खात्रीचा उद्योग आहे. राज्यातील हवामान, तसेच ग्रामिण भागात रोजगार निर्मिती व उच्चमुल्यांकित पीक रचना इ.सर्व बाबीचा विचार केल्यास तसेच देशांतर्गत व देशाबाहेरील रेशीम सुताची मागणी विचारात घेता रेशीम उत्पादन करण्यास राज्यात भरपूर वाव आहे. हवामानाच्या लहरीपणामुळे शेतीमध्ये होणारे नुकसान टाळण्यासाठी हमखास व नियमीत उत्पन्न मिळविण्यासाठी रेशीम उद्योग हा शेतक–यांकरीता वरदान आहे. तसेच राज्याच्या कृषि विकास दर वृध्दी व शेतक–याचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या दृष्टीने रेशीम उद्योगाचा महत्वाचा वाटा असणार आहे. रेशिम उद्योगाचे महत्व रोजगार निर्मीतीला असणारा वाव विचारात घेऊन रेशिम उद्योगाला राज्याच्या अर्थव्यवस्थेत केंद्रस्थानी आणण्यासाठी खालील उपाय योजना करण्यात येतील.

8.5.1. रेशीम शेतीला लोकप्रिय करुन समूह पध्द्तीने शेतकऱ्यांना शाश्वत उत्पादनाचा स्त्रोत मिळवून देण्यात येईल. शाश्वत रेशीम शेतीसाठी खाजगी सहभागाद्वारे रेशीम शेतीला स्थैर्य मिळवून देणे.

8.5.2. दुबार जातीच्या रेशीम कोष उत्पादनाला चालना देण्यात येईल.

8.5.3. पारंपारीक रेशीम निर्मीती करणा–या राज्यापेक्षा अधिक कोष व रेशीम सुत निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल.

8.5.4. जालना येथे रेशीम कोष बाजारपेठ स्थापन करण्याचे काम पुर्णत्वास नेण्यात येईल.

8.5.5.अस्तित्वातील रेशीम फार्मचा संशोधन केंद्र/रोपवाटीका/शेतकरी प्रशिक्षण केंद्र म्हणून विकास करण्यात येईल.

8.5.6. शेतकरी, विद्यार्थी, पर्यटक यांच्यासाठी नागपूर, अमरावती, औरंगाबाद व पुणे या प्रत्येक विभागातील एका रेशीम फार्मचा रेशीम संग्रहालय/मनोरंजन केंद्र म्हणून विकास करण्यात येईल.

8.5.7. तुती गट शेती/ महिला बचत गटाच्या माध्यमातून समुह पध्दतीने रेशीम शेतीचा विकास करण्यात येईल.

8.5.8. रेशीम विणकरांच्या गटांना रेशीम सुत कताई/डाईंग/प्रोसेसिंग/विव्हिंगसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्रीसाठी क्रेडीट लिंक भांडवली अनुदान देण्यात येईल.

8.5.9. अंडीपुंज निर्मिती केंद्र/चॉकी केंद्र/ रोपवाटीका उभारण्यासाठी खाजगी उद्योजकांना प्रोत्साहन देण्यात येईल.

8.5.10. प्रत्येक वर्षी मार्च–एप्रिल या महिन्यात बार्टी संस्थेच्या सहकार्याने नवीन तूती लागवड करण्यासाठी शेतकऱ्यांची नोदणी करण्याकरीता महा–रेशीम अभियान राबविण्यात येईल.

8.5.11. वन विभागाच्या सहाय्याने टसर रेशीम शेतीसाठी ऐन/अर्जून इ. खाद्य वृक्षाची लागवड वाढवून टसर रेशीम वाढविण्यात येईल.

8.5.12. तूती/टसर शेतीसाठी खाजगी उद्योजकांना शेतकऱ्यांप्रमाणे तूती/टसर लागवड व कोषोत्तर प्रक्रियांसाठी प्रोत्साहने देण्यात येईल.

8.5.13. रेशीम विणकरांच्या उत्पादनांना ई–प्लॅटफॉर्मद्वारे विक्री करण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल.

8.5.14. रेशीम संचालनालयाची पुनर्रचना करुन तांत्रिक व प्रशासकीय बळकटीकरण करण्यात येईल व लाभार्थी व उद्योजकांपर्यंत रेशीम उद्योग पोहोचण्यासाठी आवश्यक त्या तांत्रिक व पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील.

8.5.15. तुती लागवडीबाबत कमाल लाभक्षेत्र 1 एकर मर्यादीत असल्याने शेततळ्यासारख्या सुविधा देता येत नाहीत. त्यामुळे सिंचनाच्या दृष्टीने लाभक्षेत्र अकुशल भागावरील खर्च कायम ठेऊन 2 एकर पर्यंत विस्तृत करण्यात येईल.

8.5.16. टसर लागवड वन शेतीवर असल्याने या योजनेच्या लाभार्थ्याबाबत जमिन धारण मर्यादा 2 हेक्टर वरून 4 हेक्टर करण्यात येईल.

8.5.17. गडहिंग्लज येथील डीएफएल उत्पादन केंद्राची उत्पादनक्षमता वाढविण्यात येईल.

8.5.18. गडहिंग्लज, अमरावती आणि ओरंगाबाद येथे चॉकी सेंटरची स्थापना करण्यात येईल.

8.5.19. आरमोरी, जि. गडचिरोली आणि भंडारा येथे टसर ककून मार्केट स्थापन करण्यात येईल.

8.5.20. ताडबा ,पेंच, नवेगाव, नागझीरा या वन व व्याघ्र प्रकल्पाच्या स्थळी वन विभाग आणि महाराष्ट्र पर्यटन महामंडळ यांच्या सहाय्याने टसर टूरीझम कॉरीडॉर स्थापन करण्यात येईल.

8.5.21. रेशीम कोषाची साठवण व जतन करण्यासाठी ड्राईंग सेंटर व गोडावून उपलब्ध करुन देण्यात येतील.

**8.5.22. रेशीम उद्योगाचा प्रचार व प्रसिध्दी–**

रेशीम उद्योग शेतकरी ते उद्योजकापर्यंत प्रचार व प्रसिध्दीच्या विविध माध्यमांचा उपयोग करून (वर्तमानपत्रे, ग्रामसभा, आकाशवाणी, दूरदर्शन, रेशीमरथ, भित्तीपत्रके, चर्चासत्रे, प्रदर्शने ईत्यादी.) पोहोचविण्यात येईल.

## 9. लोकर उद्योग–

राज्यात दख्खनी मेंढी पासून सुमारे 1400 मेट्रीक टन इतके प्रतिवर्षी लोकरीचे उत्पादन होते मात्र यापैकी फक्त 1% इतक्या लोकरीची खरेदी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेळी मेंढी विकास महामंडळाकडून खरेदी केली जाते. या व्यतिरीक्तराज्यात तयार होणा–या लोकरीवर प्रक्रीया, वस्त्रनिर्मीती व विपणनाची कोणतीही ठोस व्यवस्था नाही. त्यामुळे राज्यात इतक्या मोठ्या प्रमाणात दख्खणी लोकरीचे उत्पादन होऊनही व या लोकरीस देशात तसेच देशाबाहेर मोठ्या प्रामाणावर मागणी असून देखील त्यावर मुल्यवर्धन होत नसल्याने, शेळी मेंढी पालनावर अवलंबून असलेल्या मोठ्या लोकसमुहाला या लाभापासून वंचित राहावे लागते. राज्यात उत्पादीत होणाऱ्या लोकरीवर, प्रक्रीया, वस्त्रनिर्मीती,इतर उत्पादने व विपणनाची व्यवस्था झाल्यास मेंढी पालन हा रोजगार निर्मीतीचा स्वतंत्र्य स्त्रोत आर्थिक दृष्ट्या किफायतशीर होऊन त्यावर अवलंबून असलेल्या लोकसमुहाच्या आर्थिक उन्नतीस त्याचा उपयोग होईल. परिणाम स्वरूप या लोकसमुहाचे खेड्यातून शहराकडे रोजगारासाठी होणारे स्थलांतर थांबेल. यासाठी खालील उपाय योजना करण्यात येतील.

9.1.1. राज्यात उत्पादीत होणाऱ्या दख्खनी लोकरीवर प्रक्रीया करण्यासाठी राज्य शासन केंद्र शासनाच्या आखत्यारीतील Wool Research Association (Thane), याच्या सहयोगाने प्रायोगीक तत्वावर सरकारी व खाजगी सहभागाने (public private partnership), प्रक्रीया उद्योग स्थापन करील. सदर प्रकल्प यशस्वी झाल्यास असे प्रकल्प राज्यातील शेळी मेंढी पालन होत असलेल्या जिल्ह्यात देखील स्थापन करण्याबाबत विचार करण्यात येईल.

9.1.2. प्रशिक्षण व भेट योजना आखून कौशल्य विकासावर भर देण्यात येईल. तसेच शासकीय जमीनी मेंढी चराऊ कुरण म्हणून आरक्षीत ठेवण्या बाबत विचार करण्यात येईल.

9.1.3. दख्खनी लोकरीची खरेदी, प्रक्रीया, वस्त्रनिर्मीती व विपणन याबाबत नियंत्रण व व्यवस्थापन, वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर, यांचेकडून करण्यात येईल.

9.1.4. तुती/मलबेरी लागवडीचा ज्या प्रमाणे मनरेगा मधे समावेश केला आहे. त्या प्रमाणे बांबू लागवडीचा समावेश मनरेगामध्ये करण्यात येईल.

**10.** अपारंपारीक तंतु उत्पादन व वापरासाठी विशेष प्रोत्साहन – अपारंपारीक तंतु (बांबू, केळी,मका, अंबाडी, घायपात, काथ्या इत्यादी.) उत्पादन व त्याचा वापर करण्यासाठी संशोधनावर भर देण्यात येईल. अपारंपारीक तंतु उत्पादन व वापरासाठी प्रोत्साहने देण्यात येतील. तंतू पिकांचे उत्पादन घेण्यासाठी मनरेगा योजनेत या पिकांचा समावेश करण्यात येईल. आवश्यक तेथे सिंचनासाठी शेततळ्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल.

**11.** प्रभावी प्रशासनाच्या दृष्टीकोनातून रोहयो आयुक्त, कौशल्य विकास आयुक्त, पशुधन विकास आयुक्तयांच्या धर्तीवर वस्त्रोद्योग संचालनालयाचे नाव वस्त्रोद्योग आयुक्तालय करण्यात येईल. रेशीम संचालनालय वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या आधिन आणण्यात येईल. त्यासाठी आवश्यक त्या आकृतीबंधाला उच्चाधिकार समितीची (HPC) ची मान्यता घेण्यात येईल.

**12.** वस्त्रोद्योगांना भाग भांडवली अनुदान तथा इतर अनुदान देण्यासाठी तसेच वस्त्रोद्योगाचा प्रचार व प्रसिध्दीसाठी वस्त्रोद्योग विकास कोष निर्माण करण्यात यावा. सदर विकास कोषात वस्त्रोद्योगाच्या एम्प्रेस मिल, नागपूर विणकर सहकारी सुतगिरणी इत्यादींच्या जमीन विक्रीतून मिळणारा काही निधी, सुतगिरणी खाजगीकरण केल्यानंतर मिळणारा निधी, परतफेड होणारे शासकीय भाग भांडवल तसेच वस्त्रोद्योगातील उद्योगांच्या उड्ठ निधीतील 50 टक्के निधी घेऊन हा कोष निर्माण करण्यात येईल.

**13.** सदर धोरणांतर्गत योजनांच्या अंमलबजावणी साठी शासन निर्णय,मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे संबंधित विभागाकडून निर्गमित करण्यात येतील.

Government of Maharashtra

**DEPARTMENT OF INDUSTRIES, ENERGY AND LABOR**

Government of Maharashtra,
Mantralaya, Mumbai – 400032
Tel.: (91-22) 22025393
**Website: https://www.maharashtra.gov.in/**

**DIRECTORATE OF INDUSTRIES**

Government of Maharashtra,
New Administrative Building,
2nd floor, Opp. Mantralaya,
Mumbai – 400032
Tel.: (91-22) 22023584/22028616
**Website: https://di.maharashtra.gov.in/**

**MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION (MIDC)**

Udyog Sarathi, Mahakali Caves Road,
Andheri East, Mumbai, Maharashtra 400093
Tel.: (91-22) 26870800
**Website: https://www.midcindia.org/**

**MAHARASHTRA INDUSTRY, TRADE AND INVESTMENT FACILITATION CELL (MAITRI)**

"Krupanidhi" Building, 9,
Walchand Hirachand Marg,
Ballard Estate, Mumbai – 400001
Tel.: (91-22) 22622362
**Email id: maitri-mh@gov.in**
**Website: https://maitri.mahaonline.gov.in/**